# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई-४०० ००५. **दूरध्वनी:** ०२२-२२१६३९६४/२२१६३९६५ **फॅक्स :** २२१६३९७६
**संकेत स्थळ: www.merc.gov.in ई-मेल: mercindia@merc.gov.in**

जाहिरात क्र. ०१/२०२१-२०२२

## जाहीर नोटीस

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. च्या एमआयडीसी नॉलेज पार्क, सर्व्हे क्र. ७७, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी (इऑन एसईझेड फेज १)) विनियम, २०२१ वर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत**

**आणि**

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. च्या सर्व्हे क्र. ७२, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी (इऑन एसईझेड फेज २)) विनियम, २०२१ वर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत**

मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) अधिनियम, २००५ अंतर्गत एमआयडीसी, नॉलेज पार्क, सर्व्हे क्र. ७७, खराडी, जिल्हा पुणे येथे स्थित असलेल्या माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (इऑन एसईझेड फेज १) आणि सर्व्हे क्र. ७२, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (इऑन एसईझेड फेज २) ''विकासक'' म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) सह एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील उप-कलम (१) नुसार, मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. पुणे हे एमआयडीसी नॉलेज पार्क, सर्व्हे क्र. ७७, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राकरिता (इऑन एसईझेड फेज १) आणि सर्व्हे क्र. ७२, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रा (इऑन एसईझेड फेज २) करिता, भारत सरकारच्या एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपरोक्त एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी एक मानीव वीज वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने, सन २०२० च्या प्रकरण क्र. ६७ आणि सन २०२० च्या प्रकरण क्र. ६८ मध्ये दि. ५ जून, २०२० रोजी दिलेल्या आदेशान्वये मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (इऑन एसईझेड फेज १) आणि (इऑन एसईझेड फेज २) च्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. च्या एमआयडीसी नॉलेज पार्क, सर्व्हे क्र. ७७, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी (इऑन एसईझेड फेज १)) विनियम, २०२१ आणि प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. इऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. च्या सर्व्हे क्र. ७२, खराडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी (इऑन एसईझेड फेज २)) विनियम, २०२१ हे स्वतंत्र विनियम तयार केले आहेत. सदर दोन्ही प्रारुप विनियमांची प्रत आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. उपरोक्त प्रारुपांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती, **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स-०२२-२२१६३९७६; ई-मेल : **mercindia@merc.gov.in**) द्वारा या पत्त्यावर **दि. ३ मे, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी** मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

**३ मे, २०२१** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि/किंवा हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ३ एप्रिल, २०२१**

**(अभिजीत देशपांडे)**
**सचिव, मविनिआ**